# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/11/2022 (शनिवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. मौजा प्रसाद कॉलनी, वार्ड ०४ बुटीबोरी येथे दिनांक २६/१०/२०२२ ते ०४/११/२०२२ चे १३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– मनिष भोला यादव, वय ३२ वर्ष, रा. प्रसाद कॉलनी वार्ड क्र ३ बुटीबोरी हे घराला कुलुप लावुन गावी गेले असता दि २६/१०/२०२२ ते दिनांक ०४/११/२०२२ चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कुलुप तोडुन घरातील १) सॅमसंग कंपनीचा एल.ए.डी टिव्ही कीमती अंदाजे ८०००/– रू., २) चांदीची पायपट्टी एक जोडी अंदाजे ६५ ग्राम कींमती अंदाजे २,९२५/–रू. व चांदीचे १० सीक्के किमती अंदाजे १०० ग्रॅम कींमती अंदाजे ४५००/– रू. व नगदी ४०००/– रू. रोख असा एकुण १९,४२५ रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 380, 454, 457 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन बोरी करीत आहे.

## जनावरे चोरी करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत गहुहिवरा कन्हान ता. पारशिवनी येथे दिनांक ०३/११/२०२२ चे १९.०० वा. ते दिनांक ४/११/२०२२ चे ०५.३० वा. फिर्यादी नामे– जयप्रकाश मोसीरत्न बुरुगपल्ली, वय ३२ वर्ष, रा. गहुहिवरा कन्हान हा आपल्या शेतातील गोठयात ३ गाई व ४ वासरू व २ मशी बांधुन घरी निघुन गेला व दिनांक ०४/११/२०२२ रोजी सकाळी ०५/३० वा. गाईचे दुध काढण्यासाठी आला असता त्याला ०१) पांढ–या रंगाची गाय किमंती अंदाजे १००००/–रू. २) ०१ लाल रंगाची गाय किंमती अंदाजे १००००/–रू ३) ०१ गोरी किमंती अंदाजे ५०००–/रू असा एकुण २५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कन्हान करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**